जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या गट विमा योजनेच्या बचत निधीच्या लाभ प्रदानाचे परिगणितीय तक्ते - सन २०२०.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः गवियो-२०२०/प्र.क्र.४३/आस्था-५**

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१
तारीख: १९ मार्च, २०२०

**वाचा -**

1. **शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. विमा-१०९०/प्र.२८०/१८, दि.१.९.१९९०**
2. **शासन निर्णय ग्राम विकास विभाग क्र.गवियो-२०१९/प्र.क्र.४०/आस्था-५, दि.२६.०७.२०१९**
3. **शासन निर्णय वित्त विभाग क्र. गवियो-२०२०/प्र.क्र.०१/विमा प्रशासन, दि.२८.०२.२०२०**

**शासन निर्णय-**

संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयानुसार १ जानेवारी, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९ या वर्षात गट विमा योजनेचे सदस्यत्व संपुष्टात येणाऱ्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना देय होणाऱ्या बचत निधीचे लाभ प्रदान करण्याचे तक्ते निर्गमित करण्यात आले होते.

२. संदर्भाधीन अनुक्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये वित्त विभागाने राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना-१९८२ अंतर्गत दिनांक १ जानेवारी, २०२० ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीत गट विमा योजनेचे सदस्यत्व संपुष्टात येणाऱ्या राज्य शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना मिळणाऱ्या बचत निधीच्या लाभाचे परिगणितीय तक्ते निर्गमित केलेले आहेत. त्यास अनुसरुन सन २०२० या वर्षात सदस्यत्व संपुष्टात येणाऱ्या / आलेल्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या बचत निधीच्या लाभाचे परिगणितीय तक्ते निर्गमित करणे आवश्यक आहे . त्यानुसार यासोबत जोडलेल्या परिगणितीय तक्त्यानुसार २०२० या वर्षात गट विमा योजनेचे सदस्यत्व संपुष्टात येणाऱ्या/आलेल्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना या परिगणितीय तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे , प्रति युनिटकरीता बचत निधीचे संचित रकमेचे लाभ प्रदान करण्यात यावेत.

३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १ जानेवारी, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीत राजीनामा/सेवानिवृत्त/सेवेत असताना मृत्यू पावल्याने व इतर अन्य काही कारणाने ज्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे गट विमा योजनेचे सभासदत्व संपुष्टात येईल त्या

कर्मचाऱ्यांना/ त्यांच्या वारसांना या सोबतच्या परिगणितीय तक्त्यानुसार देय होणारी बचत निधीची रक्कम देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

४. शासन पुढे असेही आदेश देत आहे की, जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेल्या गट विमा योजनेतील तरतुदीनुसार बचत निधीमधील रकमेवर दिनांक १ जानेवारी, २०२० पासून दरसाल दरशेकडा ७.९ टक्के दराने (तिमाही चक्रवाढ होणारे) व्याज आकारण्यात आले आहे. जिल्हा परिषद कर्मचारी गट विमा योजना-१९९० च्या विमा निधीमधील संचित रक्कमांवर दरसाल दर शेकडा ४ टक्के या दरात कोणताही बदल झाला नसल्याने याच दराने विमा निधीमधील संचित रकमांवर व्याजाची आकारणी करण्यात यावी.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या २४८ व्या परंतुकानुसार तसेच शासनाला समर्थन करणाऱ्या अन्य अधिकाराचा वापर करुन सोबतच्या परिगणितीय तक्ता सहायक संचालक (गवियो), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे चे पत्र क्र.गवियो/२०२०/जि.प.क.ग.वि.यो./परिगणितीय तक्ते/सन २०२०/२७, दिनांक ११.०३.२०२० अन्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या परिगणनेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००३१९१०५०५३२१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PANDIT KAHANDERAO JADHAV

Digitally signed by PANDIT KAHANDERAO JADHAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=130c3faa5ebf138c8b39058785ac534c17d9b377a1b84b0b4d591d63ea56da06, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=f5c40942371a6969108d4d7e802129ea5f7a19f482726930e17fe1f06ad5cc76, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PANDIT KAHANDERAO JADHAV
Date: 2020.03.19 16:37:15 +05'30'

**( पं. खं. जाधव )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल, (लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर ( दोन प्रतीत ),
२. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई / नागपूर ( दोन प्रतीत),
३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई,
४. विभागीय आयुक्त (सर्व),
५. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व ),

६. जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व),
७. जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (सर्व),
८. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती,
९. संचालक, लेखा व कोषागारे कार्यालय, मुंबई,
१०. संचालक (विमा), विमा संचालनालय, गृहनिर्माण भवन, म्हाडा, बांद्रा ( पूर्व ), मुंबई-४०० ०५१,
११. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व),
१२. वित्त विभाग (व्यय १५) व (शासकीय हमी ), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
१३. कक्ष अधिकारी, कार्यासन आस्था-७, आस्था-८, आस्था-९, आस्था-१०, आस्था-११, आस्था-१२, वित्त-१, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. निवड नस्ती, कार्यासन आस्था-५, ग्राम विकास विभाग.

***********

**ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक. गवियो २०२०/प्र.क्र.४३/आस्था.५, दिनांक १९ मार्च, २०२० सोबतचे जोडपत्र.**

मृत्यू, सेवानिवृत्ती, सेवा समाप्ती इत्यादी कारणामुळे योजनेचे सभासदत्व संपुष्टात येणाऱ्या महिन्याच्या अखेरीपर्यंतच्या प्रत्येक महिन्याला रु. ६०/- प्रमाणे अंशदान करणाऱ्या सदस्याच्या बचत खात्यामध्ये संचित होणारी बचत निधीची व्याजासह देय होणारी एकूण रक्कम दर्शविणारा तक्ता.

**सन २०२० यावर्षी सदस्यत्व संपुष्टात आल्यास देय होणारी रक्कम.**

| बचतनिधीचा सदस्य होण्याचा दिनांक | सदस्यत्व संपुष्टात येण्याचा महिना | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर |
| १ ऑक्टो. १९९० | २६७१५ | २६९३१ | २७१४९ | २७३६९ | २७५९० | २७८१२ | २८०३६ | २८२६२ | २८४८९ | २८७१७ | २८९४७ | २९१७८ |
| १ जाने. १९९१ | २६२०३ | २६४१७ | २६६३१ | २६८४८ | २७०६५ | २७२८४ | २७५०५ | २७७२६ | २७९५० | २८१७५ | २८४०१ | २८६२९ |
| १ जाने. १९९२ | २४०९७ | २४२९६ | २४४९७ | २४६९९ | २४९०३ | २५१०८ | २५३१४ | २५५२२ | २५७३१ | २५९४१ | २६१५३ | २६३६६ |
| १ जाने. १९९३ | २२६१२ | २२८०२ | २२९९३ | २३१८५ | २३३७९ | २३५७४ | २३७७० | २३९६८ | २४१६६ | २४३६६ | २४५६८ | २४७७० |
| १ जाने. १९९४ | २१११० | २१२९० | २१४७१ | २१६५४ | २१८३७ | २२०२२ | २२२०८ | २२३९५ | २२५८४ | २२७७३ | २२९६४ | २३१५७ |
| १ जाने. १९९५ | १९७७६ | १९९४८ | २०१२० | २०२९४ | २०४६८ | २०६४४ | २०८२१ | २०९९९ | २११७९ | २१३५९ | २१५४१ | २१७२४ |
| १ जाने. १९९६ | १८५९१ | १८७५४ | १८९१९ | १९०८५ | १९२५२ | १९४१९ | १९५८८ | १९७५९ | १९९३० | २०१०२ | २०२७६ | २०४५० |
| १ जाने. १९९७ | १७५३६ | १७६९३ | १७८५० | १८००९ | १८१६९ | १८३३० | १८४९२ | १८६५५ | १८८१९ | १८९८४ | १९१५० | १९३१७ |
| १ जाने. १९९८ | १६६०० | १६७५१ | १६९०३ | १७०५५ | १७२०९ | १७३६३ | १७५१९ | १७६७५ | १७८३३ | १७९९२ | १८१५१ | १८३१२ |
| १ जाने. १९९९ | १५७६९ | १५९१५ | १६०६१ | १६२०८ | १६३५६ | १६५०५ | १६६५५ | १६८०६ | १६९५७ | १७११० | १७२६४ | १७४१९ |
| १ जाने. २००० | १५०३१ | १५१७२ | १५३१३ | १५४५५ | १५५९८ | १५७४२ | १५८८७ | १६०३३ | १६१८० | १६३२८ | १६४७७ | १६६२६ |
| १ जाने. २००१ | १४३७५ | १४५११ | १४६४८ | १४७८६ | १४९२४ | १५०६४ | १५२०४ | १५३४६ | १५४८८ | १५६३१ | १५७७६ | १५९२१ |
| १ जाने. २००२ | १३७८८ | १३९२० | १४०५३ | १४१८७ | १४३२२ | १४४५७ | १४५९४ | १४७३१ | १४८७० | १५००९ | १५१४९ | १५२९० |
| १ जाने. २००३ | १३२५९ | १३३८८ | १३५१७ | १३६४८ | १३७७९ | १३९११ | १४०४४ | १४१७८ | १४३१३ | १४४४८ | १४५८५ | १४७२२ |

| बचतनिधीचा सदस्य होण्याचा दिनांक | सदस्यत्व संपुष्टात येण्याचा महिना | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर |
| १ जाने. २००४ | १२२९२ | १२४१४ | १२५३७ | १२६६१ | १२७८६ | १२९१२ | १३०३८ | १३१६५ | १३२९३ | १३४२२ | १३५५२ | १३६८३ |
| १ जाने. २००५ | ११४०० | ११५१६ | ११६३३ | ११७५१ | ११८७० | ११९९० | १२११० | १२२३२ | १२३५४ | १२४७६ | १२६०० | १२७२४ |
| १ जाने. २००६ | १०५७७ | १०६८८ | १०८०० | १०९१३ | ११०२६ | १११४० | ११२५५ | ११३७१ | ११४८७ | ११६०४ | ११७२२ | ११८४१ |
| १ जाने. २००७ | ९८१९ | ९९२५ | १००३२ | १०१४० | १०२४८ | १०३५७ | १०४६७ | १०५७७ | १०६८८ | १०८०० | १०९१३ | ११०२६ |
| १ जाने. २००८ | ९११७ | ९२१९ | ९३२१ | ९४२४ | ९५२८ | ९६३२ | ९७३७ | ९८४३ | ९९४९ | १००५६ | १०१६४ | १०२७३ |
| १ जाने. २००९ | ८४६९ | ८५६६ | ८६६५ | ८७६३ | ८८६२ | ८९६२ | ९०६३ | ९१६४ | ९२६६ | ९३६९ | ९४७२ | ९५७६ |
| १ जाने. २०१० | ७८७० | ७९६४ | ८०५८ | ८१५३ | ८२४८ | ८३४४ | ८४४० | ८५३८ | ८६३५ | ८७३४ | ८८३३ | ८९३३ |
| १ जाने. २०११ | ६७६४ | ६८५० | ६९३७ | ७०२४ | ७११२ | ७२०१ | ७२९० | ७३७९ | ७४७० | ७५६१ | ७६५२ | ७७४४ |
| १ जाने. २०१२ | ५७४२ | ५८२१ | ५९०१ | ५९८२ | ६०६३ | ६१४५ | ६२२७ | ६३१० | ६३९३ | ६४७७ | ६५६१ | ६६४६ |
| १ जाने. २०१३ | ४८०० | ४८७४ | ४९४८ | ५०२२ | ५०९७ | ५१७२ | ५२४८ | ५३२४ | ५४०१ | ५४७८ | ५५५६ | ५६३५ |
| १ जाने. २०१४ | ३९३७ | ४००४ | ४०७२ | ४१४१ | ४२१० | ४२८० | ४३५० | ४४२० | ४४९१ | ४५६२ | ४६३४ | ४७०७ |
| १ जाने. २०१५ | ३१४४ | ३२०७ | ३२७० | ३३३३ | ३३९७ | ३४६१ | ३५२६ | ३५९१ | ३६५७ | ३७२२ | ३७८९ | ३८५६ |
| १ जाने. २०१६ | २४१८ | २४७५ | २५३४ | २५९२ | २६५१ | २७११ | २७७० | २८३० | २८९१ | २९५२ | ३०१३ | ३०७५ |
| १ जाने. २०१७ | १७५१ | १८०४ | १८५८ | १९१२ | १९६७ | २०२२ | २०७७ | २१३२ | २१८८ | २२४५ | २३०१ | २३५८ |
| १ जाने. २०१८ | ११३७ | ११८६ | १२३६ | १२८६ | १३३६ | १३८७ | १४३८ | १४९० | १५४१ | १५९३ | १६४६ | १६९९ |
| १ जाने. २०१९ | ५६८ | ६१४ | ६६० | ७०६ | ७५३ | ८०० | ८४७ | ८९५ | ९४२ | ९९१ | १०३९ | १०८८ |
| १ जाने. २०२० | ४२ | ८४ | १२७ | १७० | २१३ | २५६ | ३०० | ३४४ | ३८८ | ४३३ | ४७७ | ५२३ |

**जिल्हा परिषद कर्मचारी गट विमा योजना**
**१९९० वर्गणीच्या दरात वाढ करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
### शासन निर्णय क्रमांकः गवियो २०१६/प्र.क्र.४९/आस्था-५

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
तारीख: १६ जानेवारी, २०२०

**वाचा :-**

१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.डीओआय २०८१/७०१/एडीएम-५, दिनांक २६.४.१९८२.
२) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र.विमा-१०९०/प्र.२८०/१८, दिनांक १.९.१९९०.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. गवियो-१०८९/प्र.क्र.६६४/८९-विमा, दिनांक ८.१.१९९०.
४) शासन आदेश, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. डिएसआर २४९८/सीआर ६६/१८, दिनांक २६.५.१९९८.
५) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. गवियो-२००२/प्र.क्र.३०/शा.हमी, दिनांक २६.७.२००२.
६) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.विमा २००२/प्र.क्र.१३६/आस्था-५ (१८), दिनांक १९.६.२००३.
७) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. गवियो-२०१५/प्र.क्र.४७/विमा प्रशासन, दिनांक ३०.१.२०१६.

**प्रस्तावना :-**

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेली"राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना-१९८२” जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना संदर्भ क्र .२ येथील दिनांक १ सप्टेंबर, १९९० च्या शासन निर्णयानुसार दिनांक १ ऑक्टोबर, १९९० पासून लागू करण्यात आली आहे . अ.क्र.४ येथील शासन आदेशानुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांकडून सुधारित अ , ब, क, ड वर्गीकरणानुसार गट विमा योजनेची वर्गणी वसूल करण्यास मान्यता देण्यात आली आहे . आता अ.क्र.७ येथील वित्त विभागाच्या दिनांक ३०.१.२०१६ च्या शासन निर्णयानुसार गट विमा योजनेच्या वर्गणीत सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत गट विमा योजनेच्या वर्गणीत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती . महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या २४८ च्या कलमानुसार शासनास प्रदान केलेल्या अधिकारानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

जिल्हा परिषद कर्मचारी गट विमा योजनेच्या मासिक वर्गणीचे दर व त्यानुरुप मिळणारे लाभ यामध्ये दिनांक १ जानेवारी २०२० पासून पुढीलप्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार सध्या अस्तित्वात असलेल्या दराऐवजी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे गट विमा योजनेची सुधारित वर्गणी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या जानेवारी २०२० पासूनच्या वेतनातून वसूल करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

| वर्ग | दिनांक १.१.२०२० रोजी नियमीत जिल्हा परिषद सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून वसूल करावयाची वर्गणी (एक युनिट रु.६० प्रमाणे) | दिनांक २.१.२०२० ते ३१.१२.२०२० पर्यंत नियमीत जिल्हा परिषद सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून वसूल करावयाचा केवळ विमा संरक्षणाचा हप्ता | जिल्हा परिषद सेवेत असताना कर्मचाऱ्याला मृत्यू आल्यास कुटुंबियांना देय होणारी विम्याची रक्कम |
|---|---|---|---|
| **स्तंभ-१** | **स्तंभ-२** | **स्तंभ-३** | **स्तंभ-४** |
| गट-क | रु.३६०/- (रु.तीनशे साठ) | रु.१२०/- (रु.एकशे वीस) | रु.३,६०,०००/-<br>(रु.तीन लक्ष साठ हजार) |
| गट-ड | रु.२४०/-(रु.दोनशे चाळीस) | रु.८०/- (रु.ऐंशी) | रु.२,४०,०००/-<br>(रु.दोन लक्ष चाळीस हजार) |

२. वरीलप्रमाणे सुधारित दराने वर्गणी वसूल करताना सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक.एसआरव्ही १०९८/ १६४४/प्र.क्र.२/९९/१२, दिनांक ०२ जुलै, २००२ अन्वये पदांच्या सुधारित वर्गीकरणानुसार समाविष्ट करण्यात आली असेल त्या वर्गीकरणाच्या अनुषंगाने वर्गणी वसूल करण्यात यावी. तसेच कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत किंवा आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बाबतीत वरिष्ठ श्रेणीच्या अनुषंगाने त्यांच्या मूळ पदाचा विचार न करता विमा वर्गणी वसूल करण्यात यावी.

३. (अ) वरीलप्रमाणे सुधारीत दर दिनांक १ जानेवारी, २०२० पासून लागू होतील.

(ब) सुधारीत दराने मासिक वर्गणीची वसुली ही १ फेब्रुवारी, २०२० रोजी देय होणाऱ्या जानेवारी, २०२० च्या वेतनातून वसूल करण्यात यावी.

४. गट विमा योजनेचे सदस्यत्व यापूर्वीच प्राप्त झालेल्या तसेच दिनांक १ जानेवारी २०२० रोजी किंवा तत्पूर्वी जिल्हा परिषद सेवेत "नियमितरित्या" स्थानापन्न असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीच्या गटानुसार सुधारित दराने वर्गणी संबंधितांकडून फेब्रुवारी , २०२० पासून ( जानेवारी, २०२० च्या वेतनापासून) बिनव्याजी वसूल करण्यात यावी.

५. दिनांक २ जानेवारी २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ या कालावधीतील नियमितरित्या नियुक्त / पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०२० पासून गट विमा योजनेचे सभासद करुन घ्यावे व त्यांच्या वर्गवारीनुसार सुधारित दराने वर्गणी वसूल करण्यात यावी.

६. दिनांक २ जानेवारी २०२० ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीत जिल्हा परिषद सेवेत नियमित नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून परिच्छेद क्र.१ मधील तक्त्याप्रमाणे स्तंभ-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे केवळ विमा संरक्षणाच्या हप्त्याची वसूली करण्यात यावी . गट विमा योजनेच्या पुढील वर्धापन दिनांकास यांना गट विमा योजनेचे नियमित सभासद करुन घेऊन बचत निधी व विमा निधी संरक्षणाच्या हप्त्याची रक्कम मिळून पूर्ण दराने वरील परिच्छेद १ मधील स्तंभ-२ प्रमाणे वर्गणी वसूल करण्यात यावी.

७. गट विमा योजनेच्या वर नमूद केलेल्या वाढीव दराने वर्गणी वसूल करण्याच्या संदर्भात जिल्हा परिषद कर्मचारी गट विमा योजना १९९० च्या नियमात आवश्यक त्या दुरुस्त्या यथावकाश स्वतंत्रपणे करण्यात येतील . सर्व जिल्हा परिषदांनी सदर आदेश त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणावेत.

८. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र . ०८/२०१९, दि.०२.०५.२०१९ व दि.१७.१२.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००११६१५०१०२५९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PANDIT
KAHANDERAO
JADHAV

Digitally signed by PANDIT KAHANDERAO JADHAV
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=130c3faa5ebf138c8b39058785ac534c17d9b377a1b84b0b4d591d63ea56da06,
postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=f5c40942371a6969108d4d7e802129ea5f7a19f482726930e17fe1f06ad5cc76, ou=NA,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PANDIT KAHANDERAO JADHAV
Date: 2020.01.16 15:15:46 +05'30'

**( पं. खं. जाधव )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, ( लेखापरीक्षा ), मुंबई / नागपूर ( दोन प्रतीत )
२. महालेखापाल, ( लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई / नागपूर (दोन प्रतीत)
३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
४. विभागीय आयुक्त (सर्व)

५. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
६. जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)
७. जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (सर्व)
८. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी ५ प्रतीत)
९. संचालक, लेखा व कोषागारे कार्यालय, मुंबई
१०. संचालक (विमा), विमा संचालनालय, गृहनिर्माण भवन, म्हाडा, बांद्रा ( पूर्व ), मुंबई-४०० ०५१
११. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१२. वित्त विभाग (व्यय १५) व (विमा प्रशासन), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१३. कक्ष अधिकारी, कार्यासन आस्था-७, आस्था-८, आस्था-९, आस्था-१०, आस्था-११,
आस्था-१२,
१४. वित्त-१, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई
१५. निवड नस्ती, कार्यासन आस्था-५ ग्राम विकास विभाग

*********